# भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्री जीवन

- प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड

Scanned by CamScanner

ISBN : 978-81-928882-9-3

• **भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्री जीवन**
**प्रा. डॉ. सुनिल आनंदराव राठोड**

© सुरक्षित

• **प्रकाशन क्रमांक 1051**

• **प्रकाशक**
इंडोव्हिजन पब्लिकेशन
एल.आय.सी. कॉलनी, लातूर, ता. जि. लातूर - 413531.

• **अक्षर जुळणी**
श्री. विकास ढमाले, आनंत कोटीवाले

• **मुखपृष्ठ**
**श्री. विकास ढमाले**

• **मुद्रक**
ज्योतीचंद्र ऑफसेट प्रिंटींग ॲन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर.

• **प्रथमावृत्ती : 15 मार्च 2016**

• **मुल्य 200/-**

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भटक्या विमुक्त जाती-जमाती व त्यांचे स्वरुप | ०१ |
| २ | भटक्या विमुक्तांची आत्मकथने - एक अभ्यास | ३५ |
| ३ | भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्री जीवन | ६२ |
| ४ | भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्री समस्या | ८३ |
| ५ | उपसंहार | १०६ |
| | संदर्भ सूची | ११६ |




१

# भटक्या विमुक्त जाती-जमाती व त्यांचे स्वरुप

**प्रस्तावना :-**

भारतात भटक्या-विमुक्त जाती-जमाती ह्या अनादी काळापासून अस्तित्त्वात होत्या. म्हणूनच त्यांना प्रथम 'भूमिपुत्र' असे संबोधलेले आहे. या देशाचा मूळ निवासी असलेला हा समाज आज मात्र उपेक्षितपणाचे जीवन जगत आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात या समाजाच्या कपाळी भटकंतीचा व गुन्हेगारीचा शिक्का मारला गेल्याने हा समाज आपल्या मातृभूमीचे सर्व हक्क गमावून बसलेला आहे. या देशाच्या संस्कृतीचा घटक बनून व कला-कौशल्याचा पाईक म्हणून घेणारा हा भटका समाज जगण्यासाठी मौताज झालेला आहे. मनुष्य जातीने व जन्माने गुन्हेगार असतो असा गुन्हेगारी जमातीचा कायदा इ.स. १८७१ मध्ये पास झाला आणि या कायद्यानुसार भटक्या जाती-जमाती ह्या जन्मतःच गुन्होर ठरल्या. चोरी झाली की त्या परिसरात राहणा-या भटक्या जाती-जमातीच्या लोकांना कोणताच पुरावा नसताना गुन्हेगार म्हणून पकडून त्यांना चोरी कबूल कर म्हणून अमानवी छळ केला जातो. भटक्या-विमुक्तांच्या वाट्याला आलेले हे पिढ्यान्पिढ्याचे जीवन गुलामांचेही गुलाम बनविणारे आहे. हा समाज आपल्यावर होणा-या अन्यायाविषयी कोणापुढेही कैफियत न मांडता तो अन्याय सहन करत जीवन जगतो.

Scanned by CamScanner



| | | |
|---|---|---|
| नांव | :- | प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड |
| जन्म | :- | ०६ जुलै १९६९ |
| शैक्षणिक पात्रता | :- | एम. ए. ( मराठी ), पीएच.डी. |
| अध्यापन अनुभव | :- | मराठी विभाग,<br>श्री. वसंतराव नाईक कला व<br>श्री. अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय,<br>मंगरुळपीर, जि. [illegible] |
| शोधनिबंध | :- | राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मासिक तसेच पुस्तकातून ३० शोधनिबंध प्रकाशित |
| पुस्तक प्रकाशन | :- | बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते |
| पुरस्कार | :- | १) बंजारा भुषण - २००७<br>२) शांतीदुत विद्यारत्न पुरस्कार - २००७ |

IVPL

ISBN 978-81-928882-9-3

Scanned by CamScanner

# ग्रामीण कथेतील बोलीभाषेचा अभ्यास

- प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड

Scanned by CamScanner

ISBN : 978-93-85162-09-1

• ग्रामीण कथेतील बोलीभाषेचा अभ्यास
प्रा. डॉ.सुनिल आनंदराव राठोड

© लेखकाधिन

• प्रकाशन क्रमांक 15005

• प्रकाशक
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
एल.आय.सी. कॉलनी, लातूर, ता. जि. लातूर - 413531.

• अक्षर जुळणी
श्री. विकास ढमाले, आनंत कोटीवाले

• मुखपृष्ठ
श्री. विकास ढमाले

• मुद्रक
ज्योतीचंद्र ऑफसेट प्रिंटींग अॅन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर.

• प्रथमावृत्ती : 05 मार्च 2017

• मुल्य 350/-

# भूमिका

महाराष्ट्राच्या विस्तीर्ण प्रदेशात मराठी भाषा बोलली जाते. महाराष्ट्राचे वेगवेगळे प्रादेशिक विभाग आहेत. ऐंशी टक्के लोक ग्रामीण भागात राहतात व बोलीभाषेचा वापर करतात. मराठी भाषेत जशी वाङ्मयनिर्मिती झाली व होत आहे, तशीच ग्रामीण भाषेतही वाङ्मयनिर्मिती झालेली दिसून येते.

मराठी ग्रामीण कथेवर वेगवेगळ्या अंगांनी लिखाण झालेले असले तरी नागर भाषा डोळ्यासमोर ठेवून जसा मराठीतील साहित्याचा भाषाशास्त्रीय अभ्यास झाला तसा ग्रामीण साहित्य डोळ्यासमोर ठेऊन या साहित्याचा भाषाशास्त्रीय दृष्टीने आजपर्यंत कुणी अभ्यास केल्याचे दिसून येत नाही.

शंकर पाटील, रा. रं. बोराडे व उध्दव ज. शेळके हे तीन ग्रामीण कथाकार महाराष्ट्राच्या पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या तीन प्रादेशिक विभागातील आहेत. दर बारा कोसांवर भाषा बदलते असे म्हटले जाते. मग त्या -त्या प्रदेशातील भाषेचे विशेष काय असू शकतील यावद्दलचे कुतूहल माझ्या मनात जागे झाले आणि त्यातूनच हा ग्रंथ हळूहळू आकाराला आला आहे.

मराठी ग्रामीण कथेचा आरंभ बिंदू म्हणून आपण श्री. म. माटे यांच्या कथेचा उल्लेख करतो. ग्रामीण समाजजीवनात रुढ असलेल्या अस्सल बोलीचा वापर श्री. म. माटे यांनी आपल्या कथेतून केला आहे. परंतु पुढे ग. ल. ठोकळ, मराठे इत्यादींनी ग्रामीण बोलीशी राखावे तसे इमान राखलेले दिसून येत नाही. र. वा. दिघे यांनी तर प्रमाणबोली व ग्रामीणबोली यांचे मिश्रण केलेले दिसून येते. व्यंकटेश माडगुळकरांनी मात्र ग्रामीण जीवनातील वास्तव व्यक्तिचित्रे रेखाटताना ती ती माणसे व त्यांची बोली यांच्यात कुठेही तडजोड केलेली दिसत नाही.

पहिल्या प्रकरणात ग्रामीण कथेचा उद्‌गम आणि विकास इ.स. १९४०-४१ हा मराठी ग्रामीण कथेचा आरंभ बिंदू मानला जातो. श्री. म. माटे यांच्या कथा लेखनाने मराठी ग्रामीण कथेचा पाया घातला गेला

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | ग्रामीण कथेचा उद्‌गम आणि विकास | ०१ |
| २ | मराठी प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांचे स्वरुप | ३५ |
| ३ | शंकर पाटील यांच्या कथेतील बोलीभाषा | ५१ |
| ४ | रा. रं. बोराडे यांच्या कथेतील बोलीभाषा | ९१ |
| ५ | उद्धव शेळके यांच्या कथेतील बोलीभाषा | १४४ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १८० |




प्रकरण पहिले

## ग्रामीण कथेचा उद्‌गम आणि विकास

मराठी ग्रामीण कथासाहित्याचा भाषाशास्त्रीय अभ्यास करताना आरंभी मराठी ग्रामीण कथा साहित्याचे स्वरुप आणि या साहित्याचा झालेला विकास समजून घेणे अगत्याचे ठरते. कारण ग्रामीण कथासाहित्याची निर्मिती करणाऱ्या कथाकारांची जन्मस्थळे, त्यांचे तेथे गेलेले बालपण, त्या वयात झालेले ग्रामजीवनाचे व बोलीभाषेचे गडद असे संस्कार व त्यांच्या अनुभवाचे सर्वांगीण क्षेत्र हे ग्रामजीवनाशी निगडित आहे.

**ग्रामीणतेची संकल्पना व स्वरुप :-**

'ग्रामीण' हे साहित्यातील अभिव्यक्त आशयाचे वर्णनात्मक विशेषण आहे. अर्थातच ते वैशिष्ट्यप्रदर्शक आहे. खेड्यातील म्हणजे 'ग्रामातील जीवनाची अनुभूती' ग्रामीण कथेतून व्यक्त होते. खेडेगाव, तेथील जीवनपद्धती, तेथील रीती, शेती, संस्कृती, सामाजिक,धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या इ. अनुभव कथेत येतात. थोडक्यात ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य.

'ग्रामीण' या संकल्पनेत नेमके काय अभिप्रेत आहे हे सांगताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, "ग्रामीण या शब्दाचा संबंध हा ग्रामाशी आहे, खेड्याशी आहे. ग्रामीण म्हटल्याबरोबर खेडेगांव किंवा अनागर वस्ती, शहराशिवायची वस्ती हेही आपल्या लक्षात यायला वेळ लागत नाही." थोडक्यात खेड्यातील जीवन गावगाड्यावर आधारीत असते. या गावगाड्यात जी व्यक्ती राहतात

Scanned by CamScanner



| | | |
|---|---|---|
| नांव | :- | प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड |
| जन्म | :- | ०६ जुलै १९६९ |
| शैक्षणिक पात्रता | :- | एम. ए. ( मराठी ), पीएच.डी. |
| अध्यापन अनुभव | :- | मराठी विभाग,<br>श्री. वसंतराव नाईक कला व<br>श्री. अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय,<br>मंगरुळपीर, जि. वाशिम |
| शोधनिबंध | :- | राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मासिक तसेच पुस्तकातून ३० शोधनिबंध प्रकाशित |
| पुस्तक प्रकाशन | :- | बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते |
| पुरस्कार | :- | १) बंजारा भुषण - २००७<br>२) शांतीदुत विद्यारत्न पुरस्कार - २००७ |

ज्योतीचंद्र पब्लिकेशन प्रा.लि. लातूर
ISBN 978-93-85162-09-1

Scanned by CamScanner